संक्षिप्त फौ. ख. क्र. २१८/२०२३
सरकार -वि.- संजय
नि.क्र. १३ खाली.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.४ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - अमोल शंकरराव चेट्टी,
वय ३३ वर्षे, व्यवसाय – खाजगी,
राहणार – कोराडी, ता. जि. नागपूर.

**<u>सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री जी.बी.राऊत यांचे मार्फत</u>**

१. मी संदिप बिनेकर याला ओळखतो. मी आरोपीला ओळखतो तो आज कोर्टात हजर आहे. दि.१७.०३.२०२३ रोजी सायं.७.३० वा. मी व संदिप मोटार सायकलने भिवापूरवरुन नागपूरकडे जात होतो. पांजरेपार येथील हनुमान मंदिर समोर रोडच्या बाजुने एक ट्रॅक्टर उभा होता. त्यावेळी त्या ट्रॅक्टरच्या चालकाने तो ट्रॅक्टर रस्त्याच्या खालून अचानक वर घेतला त्यामुळे त्या ट्रॅक्टरच्या ट्रॉलीचा धक्का आमच्या मोटार सायकलला लागला. त्यामुळे चालक संदिप बिनेकर याच्या खिशातील मोबाईल फुटला होता व त्याच्या छातीवर जखमेमुळे रक्त येवू लागले. त्यानंतर गावकरी तिथे जमा झाले. त्यांनी आम्हाला भिवापूर येथील ग्रामीण रुग्णालयात आणले तेथून संदिपला पुढील उपचाराकरिता नागपूर येथे मेडीकलला पाठविले. पोलिसांनी माझे बयान घेतले होते. मी ट्रॅक्टर चालकाला ओळखतो. तो आज हजर असलेला आरोपी आहे.

सरतपास संपला.

**<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत</u>**

२. मी पोलिसांना बयान देताना ट्रॅक्टर हनुमान मंदिराजवळ उभा होता असे सांगितले होते. तसे माझ्या बयानात का नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, ट्रॅक्टरने आमच्या मोटार सायकलला धडक दिली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत ट्रॅक्टरने घटना घडली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे साक्ष देत आहे.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक - ०२.०२.२०२६

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.